Indian Streams Reserach Journal
Vol.2,Issue.IV/ May; 12pp.1-4 डॉ.राऊत ए.आर. ISSN:-2230-7850

Research Papers

# शिक्षक शिक्षण : एक व्यवसाय

डॉ.राऊत ए.आर.
श्री शा.भ.ए.सो.अध्यापक महाविद्यालय,
नांदेड.

## प्रस्तावना :–

जागतिकीकरणामुळे शिक्षणात आमुलाग्र बदल घडून आले. त्यामुळे शिक्षकांची निर्मिती करणाऱ्या शिक्षण शिक्षणातही बदल घडून येणे अपरिहार्य ठरले. पूर्वी केवळ शिक्षकांची नक्कल करून ज्ञान ग्रहण करण्याची पध्दती बदलून अध्ययनार्थी केंद्रित Learner Centered शिक्षण पध्दती उद्यास आली. अध्यापन ही आज एक आंतरक्रियात्मक आणि अध्ययार्थ्यांच्या विकासाभोवती फिरणारी प्रक्रिया बनली. जरी शिक्षण प्रक्रियेत बदल घडून आलेत, आशय व पध्दती, शैक्षणिक साधने यामध्ये सुधारणा घडून आली तरी जागतिक परिस्थितीच्या तुलनेत भारतीय शिक्षक शिक्षणात फारसी प्रगती दिसून आली नाही. ही महत्वपूर्ण बाब लक्षात घेऊन एन.सी.टी.ई या संस्थेची स्थापना करून सुधारणेची मुहूर्तमेढ रोवली गेली. देशभरातील शिक्षक शिक्षणात अपेक्षित बदल करून जागतिक शिक्षणाच्या बरोबरीने आणण्यासाठी संपूर्ण देशात विविध विभांगामध्ये चार विभाग एन.सी.टी.ई ची स्थापना करण्यात आली. शिक्षक–शिक्षणात सुधारणा घडवून आणण्याकरीता एन.सी.टी.ई ने Teacher Education Curriculum : A Framework तयार करून शिक्षक शिक्षणाची दिशा निश्चित केली.

### शिक्षक शिक्षण व्यवसायाची संकल्पना :

समाजसेवावर आधारीत व्यवसाय उभा करून त्याला अधिक स्वायत्त, विकासन्मुख करून जबाबदार बनविणे म्हणजे 'व्यवसायिकरीकरण' होय.

अध्यापन हा शिक्षक शिक्षणाचा गाभा असून ते समाजसेवान्मुख असते आणि अध्यापन आणि अध्यापक शिक्षण यामध्ये अतूट नाते असते, त्यामुळे शिक्षक शिक्षण हा एक व्यवसाय आहे हे सिध्द होते.

### व्यवसायाची संकल्पना समजण्यासाठी व्याख्या :

"A profession is a vocation or occupation requiring advanced training in some liberal art or science and usually mental rather than manual works, as teaching Engineering and writing etc." Webster's New world Dictionary of the American Language.

'व्यवसायामध्ये काही उदत्त कला किंवा विज्ञान याबाबतचे अदयावत प्रशिक्षण आवश्यक असून यामध्ये बौध्दिक कार्यापेक्षा हस्तकौशल्ये समाविश्ट असतात. जसे :अध्यापन, स्थापत्यशास्त्र आणि लेखन इ.'

"Maintains that a professional occupation requires a long training involves theory as background to practice, has its own code of behavior a high degree of autonym"

डिनच्या मते, 'व्यवसायामध्ये दीर्घकालीन प्रशिक्षण, सरावासाठी सैध्दातिक आधार यांचा समावेश होतो. आणि त्याची स्वतःची अशी एक आचारसंहिता आणि स्वायत्ता असते'

1915 मध्ये फेक्सनर यांनी अध्यापन व्यवसायाची काही वैशिष्ट्ये सांगितलेले आहेत. त्यावरून संकल्पना स्पष्ट होण्यास मदत होईल.

1. उच्च बौध्दिक आधार / उच्च्ज्ञ बुध्दिमत्ता
2. उच्च वैयक्तिक जबाबदारी
3. सैध्दातिक आधार असलेल्या तंत्राचे संपादन
4. प्रात्यक्षिक उन्मुख
5. उच्च अंतर्गत व्यवस्थापन
6. निस्वार्थी भावनेने प्रेरित झालेला.

अशी विविध वैशिष्टये असणारा व्यवसाय शिक्षक शिक्षण असल्यामुळे व्यवसायाची सव्र वैशिष्ट्ये त्याला लागू पडतात. शिक्षकी व्यवसायाचे यश हे त्यामध्ये कार्य करणा–या अधिव्याख्यात्यांचा क्षमतावर अवलंबून असते. त्यामुळे कोणाला व्यावसायिक अधिव्याख्याते म्हणावे ?हा प्रश्न पडतो.

### अधिव्याख्यातामध्ये आवश्यक असलेली व्यवसायिक गुणवैशिष्टये : (Who is a Professional Teacher

Please cite this Article as : डॉ.राऊत ए.आर. , शिक्षक शिक्षण : एक व्यवसाय : Indian Streams Research Journal (MAY ; 2012)

Indian Streams Reserach Journal
Vol.2,Issue.IV/ May; 12pp.1-4

Educators)

शिक्षक शिक्षणाला व्यवसाय म्हणून मान्यता मिळाल्यामुळे या व्यवसायाचे कॅप्टन समजले जाणारे अधिव्याख्याते, त्यांच्या ठिकाणी कोणत्या क्षमता किंवा गुण असावेत यासाठी थॉर्नली यांनी 1999 मध्ये एक अभ्यास हाती घेतला. आणि त्यातील निश्पतीनुसार अधिव्याख्यात्यांची गुणवैशिष्टये मांडलेली आहेत. ती पुढीलप्रमाणे,

1.बदलत्या काळानुसार शिक्षणाच्या अध्ययनातील बदलांचा स्विकार करतो.
2.उच्च दर्जाची स्वायत्ता मान्य करतो.
3.सैध्दांतिक आधार आणि कृती यातील संबंध व आंतरक्रिया ओळखतो.
4.शिक्षकांच्या कार्यातील गुंतागुंत ओळखतो. शिक्षक शिक्षण ही गुंतागुंतीची अशी प्रक्रिया आहे.
5.शिक्षकाच्या वर्गातील आणि जीवनातील शालेय व व्यवसायिक गरजा ओळखून त्यांच्या पूर्तीसाठी वातावरण निर्मिती करतो.
6.सहभाग घेऊन आंतरक्रिया प्रस्थापित करण्यासाठी पुढाकार घेतो आणि त्याद्वारे विद्यार्थी शिक्षकांच्या अध्ययनाला चालना देतो.
7.स्वतःची चिकित्सक वृत्ती आणि त्यासाठी आवश्यक असणारी मनन, चिंतन ही प्रक्रिया अंमलात आणतो.

या व्यतिरिक्त अधिव्याख्यातांची काही विशेष वैशिष्ट्ये आहेत, जी शिक्षक शिक्षणाला व्यवसाय म्हणून ओळख निर्माण करणा–या मदतनिस ठरतात.

1.उत्तम अधिव्याख्याता आपल्या कार्याचे आठवड्यानुसार संकल्पनेच्या आधारे आणि सत्राचा कालावधी लक्षात घेऊन नियोजन करतो.
2.विद्यार्थी शिक्षकांच्या व्यावसायिक ज्ञानात वाढ करण्यासाठी सतत प्रयत्नशील असतो.
3.विद्यार्थी शिक्षकांच्या दैनंदिन अध्यापनाचे निरीक्षण करून त्यांना प्रत्याभरण देतो. आणि त्याचे अध्यापन परिणामकारक होण्यासाठी प्रयत्नशील असतो.
4.संशोधन कार्याचे आयोजन करून त्यात स्वतः सहभागी होतो. विशेषतः शिक्षक शिक्षण आणि संस्थेच्या कार्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी कृतिसंशोधन हाती घेतो.
5.सत्राच्या मध्यवधीमध्ये आणि सत्राच्या शेवटी शिक्षक शिक्षण कार्यक्रमाचा आढावा घेतो आणि आवश्यकतेनुसार सुधारणा करण्यासाठी रचनात्मक कार्य हाती घेतो.
6.विद्याशाखेत एक जबाबदार घटक म्हणून कार्य करतो.
7.विविध कार्यक्रमामध्ये सहभागी होऊन स्वतःच्या व्यवसायिक विकास साधतो आणि इतरांना कृतीमध्ये सहभागी होण्यासाठी प्रेरीत करतो.
8.संस्थेची उद्दिष्टे व व्रतविधान लक्षात घेऊन ती साध्य करण्यासाठी प्रयत्न करतो.
9.प्रत्येक अध्ययनार्थ्यांचा स्वीकार करतो आणि त्यांचे व्यक्तीमत्व विकास व व्यावसायिक विकास घडवून आणण्यासाठी विविध कृतींचा अवलंब करतो.
10.अभ्यासक्रम विकास, अध्ययन–अध्यापन प्रक्रिया आणि मुल्यमापन या संदर्भात पर्यायी मार्गाचा शोध घेऊन त्यासाठी नवनवीन तंत्राचा विकास करतो.
11.एक स्वनियत्रित अध्ययनार्थी आणि स्वनियंत्रीत अध्यापक कसा असावे याचे स्वतःच्या माध्यमातून उदाहरण इतरासमोर ठेवतो.
12.वर्गामध्ये आणि संस्थेमध्ये जिज्ञासू संस्कृती निर्माण करून तीची काळजी घेतो.
13.अनिश्चितता आणि संदिग्धता निर्माण झाल्यास संस्थेच्या हिताच्या दृष्टिने यथोयोग्य निर्णय घेतो.

अशा प्रकारे शिक्षक व त्यांच्या व्यवसायाचा संबंध दिसून येतो. जो भविश्यातील आदर्श नागरिकांची दिशा निश्चित करतो.

*संदर्भसूची :*

1.शिक्षकांच्या गुणवत्ता वाढीमध्ये जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेची भूमिका एक चिकित्सक अभ्यास – डॉ.साखरे एस.एस. (पीएच.डी संशोधन प्रबंध)
2.शिक्षक–शिक्षण – प्रा.बन्सी बिहारी पंडीत, प्रा.डॉ.सौ नलिनी पाटील., प्रा.डॉ.सौ.लता सुभाश मोरे.
3.Dictionary and Handbook and Teacher Education – R.S.Reddy.
4.Encyclopedia and Education – B.N.Das., Pal Monrao (Editoary)

**Please cite this Article as :** *डॉ.राऊत ए.आर.* , *शिक्षक शिक्षण : एक व्यवसाय* : **Indian Streams Research Journal (MAY ; 2012)**